“शासकीय प्रयोजनासाठी अधिग्रहीत जमीन विस्थापितांचा समाजशास्त्रीय अभ्यास” (विशेष संदर्भ: स्वा.रा.ती.म. विद्यापीठ व शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड.)

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

• संशोधक •

कांबळे सुनिल दिगंबर

एम.ए. (समाजशास्त्र)

• संशोधन मार्गदर्शक •

प्रा. डॉ. विलास चव्हाण

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

शंकरराव चव्हाण महाविद्यालय,

अर्धापूर, जि. नांदेड

• संशोधन केंद्र •

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

विष्णुपुरी, नांदेड.

सप्टेंबर 2022

शासकीय प्रयोजनासाठी अधिग्रहीत जमीन विस्थापितांचा समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ: स्वा.रा.ती.म. विद्यापीठ व शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड.)

प्रस्तावणा:

उत्क्रांत प्रक्रियेत मानव पृथ्वीवर अस्तित्वात आला. भटकंती अवस्थेत शिकार करून तो उपजिवीका करत असे. नंतरच्या अवस्थेत पशुपालनाला सुरूवात झाली. पशुपालन अवस्थेत तो पशुसाठी व अन्न शोधासाठी तो भटकत असे. मानवाच्या स्थिर जीवनाची सुरूवात शेतीच्या शोधाने झाली. "जगात शेती चा शोध साधारणतः 10,000 वर्शांपूर्वी प्रथम मध्यपूर्वेतील आताचे इस्त्राईल, पॅलेस्टाईन, जॉर्डन, लेबनान, सिरीया, तुर्कस्थान, कुवेत व इराक या देषांतील लगतच्या प्रदेशात लागला."[1]

उदरनिर्वाहासाठी वन - वन भटकणा-या मानवी जीवनास शेतीच्या शोधाने स्थिरता प्राप्त झाली. मानवी जीवनास स्थिरता प्राप्त झाल्यामुळे आपले जीवन अधिक सुखी व समाधानाने जगण्यास सुरूवात झाली.

शेतजमीन मालकी हक्काची परंपरा:.

शेतीचा शोध लागल्यानंतर जमीन शेतीसाठी लागवडीखाली आणण्याची प्रक्रिया सुरूवातीला मुख्यतः सामूदायिकरित्या झाली. एखादी जमात वा समूह आपले भटकेपण सोडून जंगल साफ करून जमीनीचा शेतीसाठी उपयोग करू लागला. हिंस्त्र पशु किंवा परकीय मानवी टोळ्या यांच्या आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी प्रत्येक जमातीचा किंवा समुहाचा टोळी नायक किंवा प्रमुख असे. त्यामुळे ज्या समूहाने कसण्याजोगी जमीन तयार केली त्या जमीनीचा मालक एकतर टोळी प्रमुख असे किंवा ती जमीन त्या समूहाची असे. सामूहिकरित्या जमीनीच्या मशागतीचे काम गैरसोयीचे वाटू लागल्या नंतर हे काम एका-एका व्यक्तीकडे देण्यात आले. अशा प्रकारे एका जमीनीवर एकाच वेळी समूह किंवा टोळी प्रमुख आणि जमीन कसणारी व्यक्ती यांचे हक्क निर्माण झाले.[2]

शेतीचा व्यवसाय म्हणून उपयोग: शेती व्यवसायातील कोणत्या उपक्रमातून किती नफा-तोटा झाला हे हिशोब ठेवल्यामुळे समजते. पुढच्या वर्षाचे नियोजन करता येते. शेती व्यवयासाचे नियोजन म्हणजे तो एक आराखडा असून त्यात पुढच्या कामासाठी पूर्वकल्पना आखलेल्या असतात. शेती व्यवसायात कोणते उपक्रम राबवावेत, कोणत्या पद्धतीने राबवावेत व किती उत्पादन काढावे याचा अचूक अंदाज घेतला जातो. तसेच झालेले उत्पादन कोठे व केव्हा विकावे, उत्पादित माल किती दिवस गोदामात ठेवावा व त्यानंतर तो कुठल्या बाजारपेठेत विक्री

करावा याची पूर्वकल्पना केली जाते. बरेचसे शेतकरी शेती चे नियोजन अलिखीत किंवा मनातल्या मनात करतात. पण शेती व्यवसायाचे नियोजन हे शस्त्राने व लिखित करणे आवष्यक आहे.

शेती नियोजनाचे महत्त्व सांगताना असे निदर्शनास आले आहे की, अस्तित्वात असलेल्या उत्पादन तंत्रात नियोजन केल्यामुळे शेती व्यवसायाच्या उत्पादनात वाढ होते. तसेच शेती व्यवसायाचा कारभार नीट चालविण्यासाठी खर्च, उत्पन्न, माहिती गोळा करणे, हवामानाचा अंदाज, व्यवस्थापनातील सल्ला कराराची शेती इ. शेती व्यवसाय व्यवस्थापनात विचार होणे आवष्यक आहे.

विस्थापना म्हणजे काय?

व्यक्तीच्या उपलब्ध असलेल्या क्षेत्रीय स्त्रोतांच्या वापराचे हक्क आणि वास्तव्याच्या ठिकाणास सोडून दुस-या ठिकाणी स्थलांतर करण्याच्या पक्रियेला विस्थापना म्हणतात. ज्यामुळे व्यक्तीला उत्पादनाचे साधन जमीन व घराचे हक्क आणि त्यांचे सामाजिक संबंध यांना मुकावे लागते.[3]

व्याख्या: ‘नैसर्गिक किंवा मानवी कृतीमुळे जर व्यक्ती, व्यक्ती समूह किंवा समुदायाला आपली मूळ राहण्याची जागा सोडून इतर ठिकाणी जाण्यास भाग पाडले जाते, ती जागा सोडण्याची प्रक्रिया म्हणजे विस्थापना होय.’[4]

अधिग्रहण म्हणजे काय?

खाजगी मालकीची स्थावर संपत्ती मालकाचे उत्तराधिकार कायम ठेवून सार्वजनिक प्रयोजनासाठी शासन काही काळपर्यंत किंवा कायमचे ताब्यात घेते, त्याला अधिग्रहण म्हणतात.[5]

भूसंपादन संदर्भात सर्वात जुना कायदा (1894) हा आहे. या अधिनियमात जमिनीचे अनिवार्य अधिग्रहण कोणत्याही बंधनात न घेता प्रदान केले जाते.[6]

अद्यापपर्यंत शासनाकडून व खाजगी संस्था किंवा कंपनीकडून शेतकऱ्यांची जमीन मालकांची जमीन अधिग्रहीत केली आहे. अधिग्रहीत जमीनीचा त्यांना आर्थिक मोबदलाही मिळाला आहे व काही ठिकाणी जमीन मालकांच्या कुटुंबातील एकास नोकरीवर घेण्यात आले.

भूमी अधिग्रहण संदर्भात भूसंपादन विभागाने शासनाच्या अधिनियमाच्या कलम 4 अन्वये जमीन अधिग्रहणाची अधिसूचना जारी करणे व ती प्रकाशित करणे आवश्यक आहे. अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे राजपत्रित पत्र, वृत्तपत्रे आणि संबंधित परीक्षेत्रात जमीनीचे योग्य वर्णन करणे इत्यादी अधिसूचना जमिनी

अधिग्रहीत करण्याच्या उद्देशाने सूचित करतात. जमीन अधिग्रहण संदर्भात लेखी आक्षेप असल्यास त्यावर सुनावणी होते व समस्यांचे निराकरण करून आक्षेपकतर्यांचे निवारण केले जाते.[7]

जमीन अधिग्रहण अधिसूचनाच्या प्रसिद्धीनंतर जमीन अधिग्रहीत सर्व जमीन मालकांना व्यक्तिगत नोटीस जारी करण्यात येते. यासर्व बाबी जमीन अधिग्रहण संदर्भात महत्वाच्या आहेत.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा (Review of Literature) :-

यापूर्वी या विषयावर व या विषयाच्या अनुषंगाने झालेल्या संशोधनात्मक साहित्याचा आढावा प्रस्तुत संशोधन कार्यात घेतला जाईल.

सैद्धांतिक पार्श्वभूमी किंवा दृष्टीकोन (Theoretical View):.

विविध प्रकल्पांसाठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या अन्वेषणात्मक अध्ययनाच्या दृष्टीकोनातून त्यांच्या सद्यस्थितीचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यासाठी जमीन मालकांच्या समस्यांचा तसेच त्यांना योग्य आर्थिक मोबदला मिळाला का? त्यांची कौटुंबिक स्थिती सुधारली का? सध्या त्यांच्या कौटुंबिक समस्या काय आहेत यांचा शोध घेऊन त्याचा सखोल अभ्यास करून तसेच वस्तुनिष्ठतेची मांडणी करून निष्कर्ष काढले जातील. प्रस्तुत संशोधन कार्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टीकोनाचा वापर करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या सद्यस्थितीच्या जीवनाचे अध्ययन केले जाईल. जमीन अधिग्रहीत करतांना जमीन मालकांवर सदरील दोन्ही संस्थांकडून अन्याय झाला आहे का? आणि जमीन अधिग्रहाणातून निर्माण झालेल्या प्रश्नांचा प्रस्तुत संशोधन कार्यात आढावा घेतला जाईल.

संशोधनाची उद्दिष्टे (Aim of Research):.

1) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या कौटूंबिक जीवनाचे अध्ययन करणे.

2) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांची सध्याची आर्थिक स्थिती काय आहे यांचे अध्ययन करणे.

3) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांचे काही प्रश्न, समस्या व काही लाभ अनुज्ञेय राहीले आहेत का? याचे अध्ययन करून स्वरूप स्पष्ट करणे.

4) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांना अधिग्रहीत जमीन व्यतिरिक्त इतर ठिकाणी काही शेतजमीन आहे का? असल्यास त्या जमीनीतून कुटुंबाचा व्यवस्थित उदरनिर्वाह होतो का की काही ईतर मोलमजूरी करावी लागते याचे अध्ययन करणे.

5) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या कुटुंबातून एखाद्या सदस्यास शासनमान्य पदावर नोकरीवर घेतले आहे का? घेतल्यास कोणत्या पदावर याचे अध्ययन करणे.

6) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या कुटुंबातील सदस्यांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

7) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांना जीवन जगत असताना त्यांना येणाऱ्या समस्या व ताणतणावांचा अभ्यास करणे.

गृहीतकृत्ये (Hypothesis):.

1) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांना त्यांची जमीन अधिग्रहीत झाल्यामुळे अनेक कौटुंबिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

2) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांना अधिग्रहीत जमीनी व्यतिरिक्त शेतजमीन नसेल तर त्यांना आर्थिक समस्या निर्माण होऊन कुटुंबाची सामाजिक पिळवणूक होते.

3) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या विविध समस्यांमुळे त्यांचे जीवन कष्टदायक झाले आहे.

4) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांना व कुटुंबास आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. व त्यांच्या पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यापासून वंचित रहावे लागत आहे.

5) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या घरातील व्यक्ति सदरील संस्थेत नोकरी करीत असेल व तो वर्ग 3 किंवा वर्ग 4 पदावर कार्यरत असेल तर त्या वेतनावर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवताना त्यांची गळचेपी होते.

संशोधन पद्धती (Research Methodology):.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या सद्यस्थितीतील जीवनाचे अध्ययन करण्यासाठी संशोधक सामाजिक सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करणार आहे.

समस्यासूत्रण/विषयाची निवड (Research Problem or Selection of Subject):.

कोणत्याही संशोधनाची सुरूवात ही वैज्ञानिक प्रद्धतीप्रमाणे विषयाच्या निवडीपासूनच होते. समस्यासूत्रण ही संशोधनाची पहिली पायरी आणि महत्त्वाची आहे. यामुळे संशोधनाची दिशा निश्चित होते. शा सकीय प्रयोजनासाठी अधिग्रहीत जमीन विस्थापितांचा समाजशास्त्रीय अभ्यास (विशेष संदर्भ: स्वा.रा.ती.म. विद्यापीठ व शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपुरी, नांदेड.) हा विशय निवडला आहे.

नमुना निवड (Sample Method):.

संशोधनासाठी नमुना निवड ही अत्यंत महत्वपूर्ण प्रक्रिया आहे. नमुना निवड योग्य रितीने झाली नाही तर संशोधन कार्य सदोश होते. त्यामुळे नमुना निवडीस फार महत्त्व आहे.

नमुना निवडीच्या दोन पद्धती आहेत:.

1) संभाव्यता नमुना निवड पद्धती

2) गैर संभाव्यता नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी संशोधकाने संभाव्यता नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे.

तथ्य संकलन पद्धती/संशोधनाची साधने (Data Collection System/Research Techniques):.

कोणतेही संशोधन कार्य पूर्णत्वास न्यावयाचे असेल तर तथ्य संकलनाचे दोन्हीही स्त्रोत वापरावेच लागतात. या शोध प्रबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक संशोधनाच्या साधनाची किंवा तथ्य संकलनाच्या तंत्राची आवश्यकता असते ती तंत्रे दोन प्रकारची आहेत.

1) **प्राथमिक स्त्रोतः.**

सदरील शोध प्रबंधाच्या अध्ययनासाठी प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीतील प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखत व अनुसूची या प्राथमिक स्त्रोताचा आवश्यकतेनुसार वापर करण्यात येणार आहे.

2) द्वितीयक स्त्रोतः.

यात प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्राचा समावेश होतो. संशोधन संस्थेचे अहवाल, शासकीय अधिसूचना, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके, शासकीय रेकॉर्ड, दुर्मिळ प्रलेख संशोधन अहवाल ई. चा संशोधनासाठी वापर करण्यात येणार आहे.

संकलित तथ्यांचे सारणीकरण, वर्गीकरण, सांकेतिकीकरण करून अर्थनिर्वचन केले जाईल त्या आधारावर वस्तुनिष्ठ तथ्यांपर्यंत पोहचून निष्कर्ष काढण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा:-

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी संशोधकाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड ची निवड केली आहे. त्यामुळे संशोधकाने या दोन संस्थांच्या परीक्षेत्रातील अधिग्रहीत केलेल्या शेतजमीनींच्या मालकांच्या सामाजिक जीवनाचे सर्वेक्षण पद्धतीने अध्ययन करण्यासाठी निवड केली आहे.

संशोधकाचे अध्ययन हे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड पुरतेच मर्यादीत आहे. त्यासाठी संशोधकाने ज्यांची जमीन अधिग्रहीत केली आहे, त्या सर्वांची निवड संशोधनासाठी केली आहे.

प्रस्तुत अध्ययन कार्य संशोधकास उपलब्ध होणाऱ्या प्राथमिक तथा दुय्यम संसाधनांच्या स्वरूपावर अवलंबून असणार आहे. सदरील संशोधन कार्य अधिकाधिक वस्तुनिष्ठ व प्रमाणशीर होण्यासाठी योग्य अशा नमुन्याची निवड करण्यात येणार आहे. निवडलेल्या नमुन्याबरोबरच प्रश्नावली, मुलाखत व अनुसूचीच्या आधारावरही निष्कर्ष अवलंबून राहणार आहे. संशोधनाच्या माध्यमातून शासकीय वैद्यकीय

महाविद्यालय,रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या सद्यस्थितीच्या जीवनाचे अध्ययन करून निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या सर्वांगिण विकासासाठी योजना आखण्यास हे संशोधन दिशादर्शक ठरेल.

अपेक्षित योगदान (Expective Contribution):.

सदर संशोधन अध्ययनाचा सर्वात जास्त उपयोग हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांची सद्यस्थिती कशी आहे, त्यांच्या कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे विविध पैलू व समस्यांचा शोध घेता येईल जेणेकरून त्या सोडविण्यासाठी सहाय्य होईल. तसेच समाजासमोर त्यांची सद्य जीवनपद्धती येईल. तसेच त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी योजना आखण्यात हे संशोधन दिशादर्शक ठरेल.

संशोधन अहवाल व मांडणी (Research Report and System):.

प्रस्तुत संशोधन व अहवाल लेखन प्राथमिक व दुय्यम स्त्रोत याद्वारे जी माहिती उपलब्ध होईल त्यानुसार करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले:.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या कौटुंबिक, शैक्षणिक , आर्थिक तसेच सामाजिक परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे:.

प्रकरण दुसरे हे संशोधन पद्धतीवर आधारित असून त्यामध्ये संशोधन विषयाची निवड, संशोधनाची उद्दीष्टे, गृहितकृत्ये, संशोधन आराखडा, संशोधन क्षेत्राची व्याप्ती, नमुना निवड पद्धती, तथ्य संकलनाची साधने संशोधनातील मर्यादा व संशोधन विषयाचे महत्व , स्वरूप व रूपरेषा इत्यादी घटकांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे:.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा - या प्रकरणात प्रामुख्याने यापूर्वी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने झालेल्या संशोधनाचा, वेगवेगळ्या तज्ञ मंडळींनी लिहिलेल्या ग्रंथांचा तसेच प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, रेकॉर्ड इत्यादींचा आढावा घेतला जाणार आहे.

प्रकरण चौथे:.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या समस्या त्यांना मिळालेला मोबदला, त्यांच्या कुटुंबातून कोणी नोकरीवर लागले का? लागले असल्यास कोणत्या पदावर तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड या दोन्ही संस्थेकडे आणखी काही प्रलंबित मागण्या आहेत का याचा आढावा घेण्यात येईल. त्यासाठी प्रशासकीय रेकॉर्ड परिपत्रके, कार्यालयीन आदेश यांची मदत घेण्यात यईल.

प्रकरण पाचवे:.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांचे कौटुंबिक जीवनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे:.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या कौटुंबिक उदरनिर्वाहाचा सामाजिक चिकीत्सक आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे:.

या प्रकारात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय आणि स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड साठी अधिग्रहीत केलेल्या विस्थापित जमीन मालकांच्या सद्यस्थितीच्या अभ्यासाअंती वस्तुनिष्ठ व सत्यता पडताळून निष्कर्ष व शिफारशी करण्यात येणार आहेत.

संदर्भ सूची:.

1) https://www.mrvikaspedia.in - तारक काटे, भारतीय शेती: हरवलेली वाट आणि शाश्वत पद्धतीची गरज.

2) https://www.mrvikaspedia.in - भूसुधारणा पद्धती.

3) https://www.marathivishwakosh.org - प्रा. राहूल पैठणकर, पुणे.

4) https://www.marathivishwakosh.org - व्याख्या - प्रा. राहूल पैठणकर, पुणे.

5) https://www.mrvikaspedia.in/s/sjgn

6) https://www.aurangabad.org.in /भूमी-अधिग्रहरण

7) https://www.aurangabad.org.in /भूमी-अधिग्रहण

8) 'शेती चे कायदे' - श्री. शेखर गायकवाड - श्री. पुस्तकश्री प्रकाशन. सन 2005.

9) दामले, आशा, पुनर्वसनाचे प्रश्न मुंबई.

10) रावत, हरिकृष्ण, समाजशास्त्र विश्वकोष, दिल्ली, 2005.

उपरोक्त प्रमाणे प्रकरण योजनांची आखणी तयार करण्यात आली आहे व त्यानुसार शोधप्रबंध तयार करण्यात येणार आहे.

मार्गदर्शक	**संशोधक विद्यार्थी**
प्रा. डॉ. विलास चव्हाण	**कांबळे सुनिल दिगंबर**